R.No. MHHMAR/25/A3029
लातूर
वर्ष : ६ वे, अंक नं. : ५३
दि.०५ फेब्रुवारी २०२६,वार: गुरुवार
पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

R.No. MHHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com
संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## मिलिंद नगर येथील बौद्ध विहारात महिलांच्या वतीने माघ पौर्णिमा उत्साहात साजरी





लातूर :- १ फेब्रुवारी २०२६ रविवार रोजी सकाळी ११ वाजता मिलिंद नगर येथील बौद्ध विहारामध्ये माघ पौर्णिमेनिमित्त संपूर्ण धार्मिक व सामाजिक कार्यक्रम महिलांच्या वतीनेच आयोजित करून राबविण्यात आला. या कार्यक्रमात तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर महिलांच्या नेतृत्वाखाली त्रिशरण पंचशील व सामूहिक वंदना घेण्यात आली.



हा कार्यक्रम त्रिशरण पंचशील महिला मंडळाच्या पुढाकारातून आणि महिलांच्या सक्रिय सहभागातूनच पार पडला. पूजन व वंदनेनंतर महिलांनी स्वतः तयार केलेली दुधाची खीर प्रसाद म्हणून वाटप करण्यात आली. खीर अत्यंत स्वादिष्ट असल्याने उपस्थित महिलांनी समाधान व्यक्त केले.

महिला मंडळाच्या वतीने यापुढे दर रविवारी मिलिंद नगर येथील बौद्ध विहारात सकाळी ११ वाजता महिलांच्या वतीनेच नियमित वंदना कार्यक्रम घेण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. परिसरातील सर्व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

माघ पौर्णिमेनिमित्त आयोजित या कार्यक्रमास रमा हनवते, रमा शृंगारे, शिमा जोगदंड, मीनाक्षी बनसोडे इंदुबाई बनसोडे, मयुरी बनसोडे, सुष्मा कांबळे, कोमल कांबळे, अनुसया बनसोडे, रेखा कांबळे, दिपाली कांबळे, सुरेखा बनसोडे, माया उजगीरे, कविता जोगदंड, सुजाता कांबळे, उकाबाई भुतकर, वृंदावनी हिंगे, शारदा भुतकर, अनुराधा हिंगे, राजाबाई बनसोडे, बेबीनंदा बनसोडे, शीतल हिंगे, भारती गायकवाड, सुशिला कांबळे, अरुणा भुतकर, प्रभावती बनसोडे, मंगल बनसोडे, सुनीता बनसोडे, वंदना गायकवाड, उज्वला शृंगारे, पूजा बनसोडे आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

या कार्यक्रमामुळे महिलांचे संघटन, बौद्ध विचारांचा प्रसार व सामाजिक ऐक्य अधिक बळकट झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## शिवजयंती उत्सवानिमित्त केज येथे शांतता कमिटीची बैठक संपन्न

केज/प्रतिनिधी□केज पोलीस ठाणे येथे सहाय्यक पोलीस अधीक्षक आयपीएस व्यंकटराम यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवजयंती निमित्त शांतता कमिटीची बैठक संपन्न झाली.



यावेळी बोलताना आयपीएस व्यंकटराम म्हणाले की, डीजे हा आपल्या भारतीय संस्कृतीचे प्रतीक नाही. असे यांनी प्रतिपादन केले.

काल दि.४ फेब्रुवारी २०२६ बुधवार रोजी दुपारी १२:०० वा.केज पोलीस स्टेशन येथे शिवजयंतीच्या अनुषंगाने शांतता कमिटीच्या बैठकीचे आयोजन केले पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी केले होते. या बैठकीला प्रतिसाद देत केज तालुक्यातील सर्व शिवप्रेमी, सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार उपस्थित होते.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक पोलीस अधीक्षक आयपीएस व्यंकटराम तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी केले. ते बोलताना म्हणाले की,शिवजयंती १९ फेब्रुवारी रोजी शासकीय जयंती म्हणून साजरी करण्यात येत आहे. सर्व शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष पदाधिकारी व युवकांनी शिवजयंती शांततेत साजरी करावी. गणेश उत्सवा प्रमाणे शिवजयंती ही डीजे विरहित साजरी करावी. आम्ही डीजेला अजिबात थारा देणार नाहीत. त्यामुळे सर्व जयंती उत्सव कमिटीने सांस्कृतिक उपक्रम घेऊन शिवजयंती उत्सव साजरा करावा. शिवजयंतीच्या मिरवणुकीमध्ये लहान मुले, महिला, वयोवृद्ध नागरिकांनी बाहेर पडून शिवजयंती उत्सव पहावा, आम्ही आपले संरक्षण करण्यासाठी सज्ज आहोत. दारू पिऊन गोंधळ घालणाऱ्या व छेडाछाड करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. असे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी सज्जड इशारा दिला.

शिवजयंती उत्सव साजरा करताना विविध अडचणी बाबत जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष व पदाधिकारी आणि नागरिकांनी आपले म्हणणे मांडले यावर संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांनी सदर प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना आयपीएस व्यंकटराम म्हणाले की, डीजे हा आपल्या भारतीय संस्कृतीचे प्रतीक नाही. त्यामुळे आपण छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार आचरणात आणण्यासाठी विविध सांस्कृतिक उपक्रम घ्यावेत. डीजे हा नागरिकांच्या जीवितस धोकादायक आहे. माननीय न्यायालयाच्या आदेशानुसार डीजेला बंदी आहे. शिवजयंती उत्सव साजरा करताना दोन समाजामध्ये तेढ निर्माण होणार नाही. याची सर्वांनी नोंद घ्यावी. व महिलांच्या आणि नागरिकांच्या सुरक्षेतेसाठी आम्ही पोलीस म्हणून कायम तत्पर आहोत.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक संदीप मांजरमे यांनी केले तर उपस्थितांचे आभार पोलीस उपनिरीक्षक श्री. बनसोडे यांनी मानले.

या शांतता कमिटीच्या बैठकीस सामाजिक संस्था, संघटना व विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिवजयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष,सचिव, पदाधिकारी आणि पत्रकार बांधव उपस्थित होते.

## भ्रष्टाचार, कमिशनखोरी संपवून शासनाच्या योजना सामान्य माणसाच्या दारात पोहोचवण्यासाठी काँग्रेस पक्षाने स्वच्छ प्रतिमा असलेले उमेदवार दिले



लातुर प्रतिनिधी: लातुर जिल्हा परिषद आणि औसा पंचायत समिती कारभारातील भ्रष्टाचार, कमिशनखोरी संपवून शासनाच्या योजना सामान्य माणसाच्या दारात पोहोचवण्यासाठी काँग्रेस पक्षाने स्वच्छ प्रतिमा असलेले उमेदवार दिले आहेत. या उमेदवारांना प्रचंड मताधिकेने विजयी करावे असे आवाहन राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातुर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे.

लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ निमित्ताने राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातुर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार दि. ४ फेब्रुवारी रोजी दुपारी औसा तालुक्यातील आशिव व मातोळा जिल्हा परिषद गट व गण तसेच तुंगी (बु) आणि नांदुर्गा या पंचायत समिती गणातील काँग्रेस आघाडी उमेदवार यांच्या श्री जिवाजी महाराज मंदिर जवळ, आशिव या ठिकाणी जाहीर प्रचार सभा पार पडली. यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून आशिव येथील प्रचार सभेचा शुभारंभ करण्यात आला. लातुर जिल्ह्यातील औसा तालुक्यातल्या आशिव जिल्हा परिषद गटातील सौ.सई पृथ्वीराज गोरे व पंचायत समिती गणातील श्री.धनराज मारुती बनसोडे व तुंगी (बु) पंचायत समिती गणातील श्री.दशरथ वेंकट सर्जे आणि मातोळा जिल्हा परिषद गटातील सौ.दिपाली श्यामराव भोसले व पंचायत समिती गणातील सौ.वैशाली इंद्रजित घोडके व नांदुर्गा पंचायत समिती गणातील श्री. निलेश मनोहर काकडे या काँग्रेस आघाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ आशिव या ठिकाणी प्रचार सभेचे आयोजन करण्यात आलेले होते.

लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक प्रचारात औसा तालुक्यातील आशिव जिल्हा परिषद गट व गण तसेच तुंगी पंचायत समिती गण आणि मातोळा जिल्हा परिषद गट व गण तसेच नांदुर्गा गणातील काँगेस आघाडीच्या उमेदवाराना मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून संपूर्ण जिल्हा परिषद गट व गणातील वातावरण काँग्रेसमय बनले असल्याचे पाहायला मिळत आहे.यावेळी बोलताना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख म्हणाले, लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक निमित्ताने आज आपण आशिव या ठिकाणी आयोजित या विराट सभेसाठी या ठिकाणी एकत्र आलेले आहोत.या सभेतील आपली उपस्थिती पाहून आपल्या उमेदवारांचा विजय निश्चित मानायला हरकत नाही असे ते म्हणाले.

पूढे बोलतांना आमदार देशमुख म्हणाले, आशिव, मातोळा या परिसरात उसाचे उत्पादनमोठ्या प्रमाणात आहे, ही बाब लक्षात घेऊन आदरणीय विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वात आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांनी श्रीसंत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याची उभारणी केली, मध्यंतरी काही काळ हा कारखाना बंद राहिला परंतु मांजरा परिवाराने पुढाकार घेऊन पुन्हा हा साखर कारखाना सुरू केला आहे, या कारखान्याचा आणखीन विस्तार होईल सोबत उपपदार्थ निर्मितीचे इतर प्रकल्प उभारले जातील त्या माध्यमातून या भागात आर्थिक क्रांती घडवली जाईल, या परिसरातील जीवनमान उंचावण्यासाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या माध्यमातून सर्व योजना अत्यंत काटेकोरपणे राबवल्या जातील, प्रत्यक्ष लाभार्थ्यांनाच योजना मिळाव्यात यासाठी काटेकोर नियोजन केले जाईल, हे नियोजन व्हावे आणि त्याची अंमलबजावणी ही चांगल्या पद्धतीने व्हावी यासाठी औसा तालुक्यात काँग्रेस पक्षाने यावेळेस अत्यंत स्वच्छ प्रतिमेचे आणि कार्यक्षम उमेदवार दिले आहेत त्यांना

भरघोस मतानी विजयी करावे असे आवाहनही यावेळी केले. यावेळी ग्रामस्थांनी केलेल्या तावशी गुळखेडा गावासाठी आरोग्य उपकेंद्र, आशिव येथे सरकारी दवाखाना व्हावा,शिंदाला या ठिकाणी बस थांबा करावा या व यासारख्या अन्य काही स्थानिक मागण्या प्राप्त झालेल्या असून याला मार्गी लावत आपल्याला या भागाचा सर्वांगीण विकास देखील साधायचा आहे आणि यासाठी आपली साथ महत्वाची असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान या जाहीर प्रचार सभेत प्रा. यशवंत भिंगे,सौ.सई गोरे, दिपाली भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त करीत काँग्रेस आघाडीच्या सर्व उमेदवाराना बहुमताने विजयी करून लातुर जिल्हा परिषद व पंचायत समिती मध्ये पाठवावे आणि आपल्या सेवेची संधी उपलब्ध करून द्यावी अशी विनंती केली.

यावेळी श्रीशैल उटगे, सचिन पाटील,ॲड.प्रदीप राठोड,ॲड. श्रीकांत सूर्यवंशी,पृथ्वीराज गोरे,किरण पाटील,कालिदास माने,कुमार काकडे,यशवंत चव्हाण, आप्पासाहेब घाडगे,श्याम सूर्यवंशी,अल्ताफ शेख, प्रकाश मिरगे,नारायण साठे, ॲड. स्नेहल उटगे,बालाजी झिपरे यांच्यासह आशिव व मातोळा जिल्हा परिषद गट व गण यासह तुंगी (बु) तसेच नांदुर्गा पंचायत समिती गणातील मतदार बंधू भगिनी,काँग्रेस आघाडीचे पदाधिकारी,सदस्य,कार्यकर्ते,महिला भगिनी व परीसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध पोलिसांची धडक मोहीम.एका महिन्यात २६५ गुन्हे दाखल; २५ लाख ९१ हजार ८९० रुपयांचा मुद्देमाल जप्त.

लातूर :-समाजातील शांतता, सुरक्षितता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच जिल्ह्यात लपूनछपून सुरू असलेल्या अवैध धंद्यांचा समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने लातूर जिल्हा पोलीस दलाकडून प्रभावी व कठोर कारवाई करण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेला अवैध धंद्यांविरोधात ठोस आणि परिणामकारक कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश दिले असून या आदेशांच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक श्री.अमोल तांबे व अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर जिल्हा पोलीस दलाकडून दिनांक ०१ जानेवारी २०२६ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये जिल्ह्यातील शहरी तसेच ग्रामीण भागात एकाचवेळी नियोजनबद्ध पद्धतीने कारवाया करण्यात आल्या. या विशेष मोहिमेदरम्यान अवैध देशी व विदेशी दारू विक्री करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली. लातूर पोलिसांनी २०० व्यक्तींविरुद्ध १९७ गुन्हे दाखल करून रु. १०,०३,९१०/- किमतीचा देशी-विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त केला आहे.त्याचप्रमाणे मटका व जुगारासारख्या अवैध जुगार धंद्यांविरोधातही कडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत १५८ व्यक्तींविरुद्ध ६८ गुन्हे दाखल करण्यात आले असून, १५,८७,९८०/- रुपये किमतीचे जुगाराचे साहित्य व रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.एकूणच या एका महिन्याच्या विशेष मोहिमेमध्ये लातूर जिल्हा पोलीस दलाने अवैध धंदे करणाऱ्या २७९ व्यक्तींविरुद्ध २६५ गुन्हे दाखल करून रु. २५,९१,८९०/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.तसेच लातूर शहरात आदर्श कॉलनी परिसरात कारवाई करत एका महिलेमार्फत चालविण्यात येणारे कुंटणखाण्यावर छापेमारी करण्यात आली असून चार पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. स्वतः चे आर्थिक फायद्यासाठी पीडित महिलांना पैशाचे अमिष दाखवून वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडणाऱ्या महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.एकंदरीत अवैध धंद्यावरील दाखल गुन्ह्यातील आरोपी पुन्हा अवैध धंद्यांमध्ये सहभागी होऊ नयेत, यासाठी त्यांच्यावर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. सदर प्रतिबंधक आदेशांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांविरुद्ध पुन्हा कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा लातूर पोलिसांकडून देण्यात आला आहे.पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी यावेळी स्पष्ट केले की, लातूर जिल्ह्यात अवैध धंद्यांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व समाजातील सुव्यवस्था राखण्यासाठी अशा कारवाया यापुढेही सातत्याने व अधिक तीव्रतेने सुरू राहतील. लातूर जिल्हा पोलीस दलाची ही कारवाई अवैध धंदे करणाऱ्यांसाठी कडक इशारा असून, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाणार असल्याचे यानिमित्ताने स्पष्ट करण्यात आले आहे.

# भादा सर्कलला विकासापासून वंचित ठेवणाऱ्या काँग्रेसला मतदारांनी धडा शिकवावा आ. कराड

लातूर– वर्षानुवर्ष गोड बोलून, खोटे आश्वासन देऊन सातत्याने सत्तेची केंद्र बळकावणाऱ्या काँग्रेसवाल्यांनी आजपर्यंत भादा सर्कलला विकासापासून वंचित ठेवले. कुठलीही योजना दिली नाही, कोणतेही विकासाचे काम केले नाही. मात्र देशात, राज्यात भाजपाचे सरकार आल्यानंतर आणि मी आमदार झाल्यानंतर खऱ्या अर्थाने या भागाला न्याय मिळाला. भादा सर्कलला विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम झाले तेंव्हा मतदारांनी विकासाच्या पाठीशी खंबीरपणे राहून भाजपाच्या उमेदवारांना बहुमताने विजयी करावे असे आव्हान लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी केले.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीतील भाजपाचे भादा जिप गटातील उमेदवार सौ. छायाताई पदमाकर चिंचोलकर, भादा पंस गणातील उमेदवार बळीराम काकासाहेब साळुंके आणि बोरफळ पंस गणातील उमेदवार सौ. भाग्यश्री कृष्णा साळुंके यांच्या प्रचारानिमित्त मंगळवारी सायंकाळी भादा येथे भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांची प्रचंड मोठी जाहीर सभा झाली. या जाहीर सभेला प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता यात महिलांची संख्या लक्षणीय होती. सभेस भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, अॅड. मुक्तेश्वर वागदरे, उद्धव काळे, बालाजी शिंदे, पदमाकर चिंचोलकर, रेवणसिद्धआप्पा पाटील, नरेंद्र सरवदे, महादेव मुळे, रवींद्र पाटील, बालाजी साळुंके, गिरीधर पवार, श्रीनाथ बंडगर, महादेव गुरुशेट्टे, प्रशांत पाटील, अक्षय भोसले, सतीश कात्रे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

देशात सर्वाधिक काळ सत्ता




उपभोगणाऱ्या काँग्रेसने गरिबांना गरीब ठेवण्याचे पाप केले. देशात परिवर्तन होऊन मोदीजींचे सरकार सत्तेवर आल्यानंतर सबका साथ, सबका विकास यानुसार विविध जनहिताच्या कल्याणकारी विविध योजना सुरू केल्या. जातीपातीचा विचार न करता गोरगरीब सर्वसामान्य गरजूंना सर्व योजनेचा लाभ दिला असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य शासनाने ग्रामीण भागाच्या विकासाला गती दिली. लाडकी बहीण योजनेसह विविध योजना देऊन समाजातील सर्व घटकांना न्याय दिला. सर्वत्र होत असलेल्या विकास कामामुळे सर्वसामान्य जनता भाजपाच्या पाठीशी असून देशात आणि राज्यात काँग्रेस हद्दपार झाली. लातूर जिल्ह्यातही एक आमदार वगळता कुठेही काँग्रेस नाही. उरली सुरली काँग्रेस या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत नेस्तनाबूत झाल्याशिवाय राहणार नाही. भादा सर्कल मधील भाजपाचे तिन्ही उमेदवार सर्वसामान्य कुटुंबातील असून गरिबीची जाण असणारे आहेत. मताच्या माध्यमातून जनतेच्या सेवेची संधी मागत आहेत. सर्व सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही मत मागत आहोत. काँग्रेसवाल्यांना विकास कामाशी आणि जनतेशी काहीही घेणे देणे नाही केवळ नेत्याच्या प्रतिष्ठेसाठी मत मागत असल्याचा आरोप करून आ. कराड म्हणाले की, लातूर ग्रामीण मतदार संघात साडेपाचशे भजनी मंडळांना भजनाचे साहित्य वाटप केले त्यावर काँग्रेसवाल्यांनी भजनातून विकास होणार आहे का? अशी टीका केली या टीकेचा समाचार घेताना तमाशा नाचून आणि लोकांना दारूपाजून विकास होणार आहे का? असा प्रश्न उपस्थित केला. वारकरी संप्रदायातून एकात्मता जोपासली जाते नामस्मरण होते या वारकऱ्यांना नाव ठेवत असाल तर तुमची वाताहात झाल्याशिवाय राहणार नाही असेही आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

भादा आणि या सर्कल मधील विविध गावातील शाळा दुरुस्ती, विविध मंदिराचा जिर्णोद्धार, गावांतर्गत रस्त्याची कामे, आरोग्याच्या सुविधा, समाज मंदिर स्मशानभूमीचा विकास यासह विविध विकास कामांना लाखो नव्हे तर कोट्यावधी रुपयाचा निधी देण्याचे मला भाग्य मिळाले. शासनाच्या विविध व्यक्तिगत योजनेचा लाभ असंख्य गरजू लाभार्थ्यापर्यंत पोहोचण्याचे भाग्य मला मिळाले. केंद्रात भाजपाचे, राज्यात भाजपाचे सरकार असून भाजपाचा आमदार असल्याने आपल्या भागाच्या विकास कामाची गती वाढवण्यासाठी येणाऱ्या सात तारखेला कमळ चिन्ह समोरील बटन दाबून भादा सर्कलमधील तिन्ही उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करून आशीर्वाद द्यावेत काम करण्याची संधी द्यावी असेही आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

या सभेत ज्येष्ठ मार्गदर्शक रेवणसिद्ध पाटील, पदमाकर चिंचोलकर, बालाजी शिंदे, प्रशांत पाटील, कृष्णा साळुंके, सुलभाताई कुलकर्णी यांच्यासह जिप गटातील उमेदवार सौ. छायाताई चिंचोलकर, उमेदवार बळीराम साळुंके यांनी आपले मनोगत व्यक्त करून आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामाची माहिती दिली व भादा सर्कलच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपाला साथ द्या विकास कामांना मत द्या असे आवाहन केले. प्रारंभी मंडलाध्यक्ष उद्धव काळे यांनी सभेचे प्रास्ताविक केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. शेवटी बालाजी साळुंके यांनी आभार मानले.

या सभेस श्रीनाथ बचाटे, रामकृष्ण जाधव, सुधीर माने, बालाजी हजारे, मारूफ आत्तार, राहुल कदम, श्रीपाद शिंदे, व्यंकट रसाळ, सागर भोकरे, अंगद जेटनवरे, रामकृष्ण गोरे, आप्पासाहेब मोहिते, सोमनाथ बनसोडे, सचिन शिवलकर, लालासाहेब लटुरे, दिगंबर चिंचोलकर, दीपक मानधने, संजय बनसोडे, दीपक शिवलकर, दयानंद गायकवाड, प्रेमनाथ लटुरे, गोरख बनसोडे, योगेश लटूरे, विश्वनाथ पाटील, खय्युम मुलानी, रामदास शेळके, सचिन मुकडे, बशीर सय्यद यांच्यासह भादा आणि परिसरातील भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठाची वाटचाल लोकविद्यापीठ ते ग्लोबल मॉडेल – डॉ. निर्मलजित सिंह कलसी

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षान्त सोहळा उत्साहात संपन्न

नाशिक (प्रतिनिधी) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे भारतातील आघाडीचे 'फ्युचर ऑफ लर्निंग' आहे. हे विद्यापीठ आपल्या विविध शिक्षणक्रम आणि शैक्षणिक आदान प्रदान व्यवहार यामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा मोठ्या कौशल्याने वापर करत आहे. त्यामुळे हे विद्यापीठ लोक विद्यापीठाचा दर्जा कायम राखतांनाच शैक्षणिक विश्वात 'ग्लोबल मॉडेल' बनण्याकडे वाटचाल करत आहे, असे गौरवोद्गार भारत सरकारचे माजी अतिरिक्त मुख्य सचिव (गृह व न्याय विभाग) तथा राष्ट्रीय व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण परिषद – एनसीव्हीईटी (छउतएढ – छरींळेपरश्र ऊेपलळश्र षेी तेलरींळेपरश्र एवीलरींळेप रपव ढीरळपळपस) चे माजी अध्यक्ष डॉ. निर्मलजित सिंह कलसी (सेवानिवृत्त आय.ए.एस.) यांनी येथे काढले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा ३१ वा दीक्षान्त सोहळा विद्यापीठ आवारात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून दीक्षान्त भाषण करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्यासह डॉ. बाळासाहेब कृषी विद्यापीठ, दापोलीचे कुलगुरू डॉ. संजय भावे, मुक्त विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य प्रा. डॉ. संजीवनी महाले, डॉ. अक्षया निकुंभ, डॉ. अनिल गावित, डॉ. प्रसेनजीत फडणवीस, डॉ. दत्तात्रय गुजराथी, प्रा. वाल्मिक सरवदे, डॉ. संजय भावे, श्री. नरेंद्र जोशी, प्रा. एन. के. दास, कुलसचिव तथा वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील व विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांचे संचालक आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आपल्या भाषणात पुढे बोलतांना डॉ. निर्मलजित सिंह कलसी म्हणाले की एकाचवेळी १ लाख २३ हजार ९२१ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान होणे हे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यापकतेचे, समावेशकतेचे व शैक्षणिक बांधिलकीचे द्योतक आहे. दरवर्षी लाखो विद्यार्थी या विद्यापिठाशी संलग्न असतात. वैविध्यपूर्ण शिक्षणक्रम, दर्जेदार पाठ्यपुस्तके, परीक्षांचे निकाल वेळेत जाहीर करणे, गुणपत्रिका व प्रमाणपत्रासाठी अत्याधुनिक ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर अशी ही विद्यापीठाची प्रगती थक्क करणारी आहे. राज्यातील व राज्याबाहेरील अनेकजण विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाधारित उपक्रम आणि प्रणालीची माहिती घेत अवलंब करत आहेत. हे विद्यापीठाचे व्यापक यश आहे. त्यासाठी विद्यापीठ नेतृत्व व विद्यापीठ परिवार कौतुकास पात्र आहे. जगभरात उच्च



शिक्षणाची व्याख्या बदलत असून त्यात मुक्त विद्यापीठांचे महत्व वाढत आहे. मुक्त विद्यापीठे ही आता दुय्यम पर्याय राहिली नसून सर्वसमावेशकतेची आणि राष्ट्रीय क्षमतावृद्धीची अग्रणी केंद्रे बनली असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. देश विदेशातील बदलती परिस्थिती लक्षात घेता स्थैर्याची कोणतीही हमी नसणे, क्षमतेमुळे संधीची दारे उघडणे आणि मूल्यांचे महत्व वाढत जाणार ही तीन ठळक वास्तव त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्याचबरोबर आयुष्यभर नवनवीन गोष्टी शिकत राहणे, कुठल्याही एका गोष्टीत प्राविण्य मिळविणे, तंत्रज्ञानाला आपला स्नेही बनवणे, स्वत:विषयी इतरांमध्ये विश्वास निर्माण करणे, इतरांशी तुलना न करता आपले प्रामाणिक योगदान, नितीमुल्यांशी तडजोड न करणे व सदैव सेवाव्रती राहणे ही यशाची सप्तसूत्री असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. विद्यापीठाने आगामी काळात उद्योगाशी सुसंगत असे अल्पकालीन शिक्षणक्रम पूर्वीपेक्षा मोठ्या प्रमाणात विकसित करावेत, विद्यार्थ्यांना एआय तंत्रज्ञान आधारित वैयक्तिक शिकवणी साहाय्य करावे महाराष्ट्र राज्याच्या प्राधान्य क्षेत्रासाठी संशोधाह्न व उपाय सुचवावेत अशी अपेक्षा डॉ. कलसी यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस व्यक्त केली.

या पदवीदान सोहळ्याच्या अध्यक्षपदावरून बोलताना विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा संजीव सोनवणे म्हणाले की जगात कौशल्याधारीत मनुष्यबळाची मागणी वाढली आहे. त्यानुसार काळाची कास पकडत विद्यापीठाने तीन महिने कालावधीपासून वर्षभर मुदतीचे विविध नवीन अभ्यासक्रम सुरु केले आहेत. त्यातही ऑनलाईन शिक्षणक्रमांची संख्या अहि शंभरच्यावर नेण्याचे विद्यापीठाचे नियोजन आहे. विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत विद्यापीठाने स्वत:चा संस्थात्मक विकास आराखडा आणि दृष्टीकोन आराखडा (२०२५ ते २०३५) तयार केला आहे. विद्यापीठ स्थापनेपासून एकूण ४५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा लाभ घेतला आहे. त्यात चार लाख विद्यार्थ्यांचा कृषी शिक्षणक्रमात समावेश आहे. विद्यापीठाची २८०० हून अधिक शैक्षणिक प्रकाशने व दोन हजार पेक्षा अधिक दृक श्राव्य अध्ययन संसाधने अनमोल आहेत. डिजिटल ओळखपत्र असलेले 'यशकार्ड' हे विद्यार्थ्यांसाठी अतिशय उपयुक्त ठरत आहे. वाढवन बंदर प्रकल्पासाठी विद्यापीठाचा सन २०३० पर्यंत तीन लाख कुशल मनुष्यबळ प्रशिक्षणाचा मानस आहे. विद्यापीठाने शेतकऱ्यांसाठी सुरु केलेला कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित प्रशिक्षण कार्यक्रम व महाज्ञानदीप प्रकल्पविषयी देखील त्यांनी माहिती दिली. देश समृद्ध करण्याच्या दृष्टीने आपल्या परीने सर्वोत्तम सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहन देखील त्यांनी आपल्या भाषणाच्या अखेरीस केले.

तत्पूर्वी प्रमुख अतिथी व उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते माशालकर अष्टमी शिवानंद (बी.ए.), बेतागर विनोद प्रकाश (बी. लिब.), येरणे हरीश विस्तारी ( जनसंज्ञापण व पत्रकारिता), भूतडा साईनाथ श्रीराम (एम. बी. ए.), राउत काजल रामचंद्र (एम. कॉम), शेलार शीतल सुभाष (बी. कॉम), कोल्हे आरती पांडुरंग (एम. ए. शिक्षणशास्त्र), कस्तुरे प्रतिमा रामकृष्णा (बी.ए. शिक्षणशास्त्र ), सिल्व्हेरीया व्हीन्सेंट मायकल (बी.सी.ए.), शुमैला जबीन हमजा खान (एम. एस्सी. भौतिकशास्त्र), पवार स्मिता प्रताप(एम. एस्सी. गणित) या अकरा विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे सुवर्णपदक देवून गौरवण्यात आले. तसेच माशालकर अष्टमी शिवानंद या विद्यार्थिनीस प्रातिनिधिक स्वरूपात ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित क्युआर कोड असलेल्या पदवीची डिजिटल प्रत देखील मान्यवर प्रमुख अतिथी डॉ. कलसी यांच्या शुभहस्ते हस्तांतरित करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती शुभांगी पाटील व श्री. दत्ता पाटील यांनी केले.

या ३१ व्या दीक्षान्त समारंभांप्रसंगी पीएच. डी., पदव्युत्तर पदवी, पदवी व पदविका अशा विविध प्रकारच्या १०९ शिक्षणक्रमांतील एक लाख २३ हजार ९२१ विद्यार्थ्यांना यंदा पदवी प्रदान केली गेली. त्याचे वैशिष्ट्ये म्हणजे त्या पदवीधारकात ६० वर्ष वयावरील २०८ विद्यार्थी, ७७ दृष्टीबाधित विद्यार्थी, विविध कारागृहात शिक्षा भोगत असलेले ६८ बंदीजन यांचा समावेश होता. १ लाख २३ हजार ९२१ पैकी पदविकाधारक १२ हजार ६३७, पदवीधारक ९० हजार ७०८, पदव्युत्तर पदवीधारक २० हजार ५७१, पीएच. डी. धारक – ५ विद्यार्थी. ७१ हजार ७९१ पुरुष व ५२ हजार १३० स्त्री विद्यार्थी यांचा समावेश होता.

तत्पूर्वी सकाळी विद्यापीठ प्रांगणातील यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्यास प्रमुख अतिथी डॉ. कलसी यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार – फुले अर्पण करून मानवंदना देण्यात आली. परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील यांनी ज्ञानदंडासह विद्वत मिरवणुकीचे नेतृत्व केले. प्रमुख मान्यवर यांच्या व्यतिरिक्त मंचावर विदयशाखांचे संचालक श्री. नागार्जुन वाडेकर, डॉ. सुरेंद्र पाटोळे, डॉ. माधुरी सोनवणे, डॉ. चेतना कमळस्कर, प्रा. डॉ. जयदीप निकम, डॉ. नितीन ठोके, डॉ. रश्मी रानडे, प्रा. गणेश लोखंडे, प्रा. कैलास मोरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. तसेच यावेळी विद्वत परिषदेचे सदस्य डॉ. संजय तांबट, प्रा प्रकाश देशमुख, प्रा. सज्जन थुल, डॉ दयाराम पवार, डॉ प्रकाश बर्वे, डॉ लतिका गायकवाड, डॉ मधुकर शेवाळे, प्रा. राजेंद्र वाघ, श्री. मधुकर गवळी, डॉ. राजेंद्र विखे पाटील, नियोजन मंडळ सदस्य डॉ. काकासाहेब मोहिते व डॉ. वाणी लातूरकर, श्री. गोविंद डंबाळे (सरपंच गोवर्धन ग्रामपंचायत), श्री. बाळासाहेब लांबे (उपसरपंच गोवर्धन ग्रामपंचायत), श्री. पी. के. जाधव (माजी सरपंच गोवर्धन ग्रामपंचायत), जनसंपर्क अधिकारी श्री. महेंद्र बनसोडे, विद्यापीठ विभागीय केंद्र संचालक यांची देखील विशेष उपस्थिती होती. राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने सोहळ्याची सुरुवात तर राष्ट्रगीताने सांगता करण्यात आली.

या दीक्षांत समारंभानिमित्त विद्यापीठ आवार हे दीक्षांत शाल परिधान केलेले विविध वयोगटातील व राज्यभरातील विद्यार्थी विद्यार्थिनी, त्यांचे पालक, मित्र परिवार व अभ्यागत यांनी अक्षरश: गजबजून गेले होते. विद्यापीठातील विविध नयनरम्य ठिकाणी हे विद्यार्थी विद्यार्थी गप्पा गोष्टी व सेल्फी, समूह छायाचित्रे घेण्यात सकाळपासून मग्न दिसून येत होते. त्यामुळे विद्यापीठ आवारात एक वेगळेच चैतन्य ओसंडून वाहत असल्याचे जाणवत होते.

ब्लॉक चेन प्रणाली आधारित प्रमाणपत्र :- दीक्षान्त समारंभात विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आलेली पदवी व पदविका प्रमाणपत्रे वैशिष्ट्यपूर्ण असून त्यावर ब्लॉक चेन प्रणालीवर आधारित क्यु आर कोड छापलेला होता. सदर क्यू आर कोड कुठेही व कधीही स्कॅन करून प्रमाणपत्राची वैधता पडताळणी करता येत होती. पदवी / पदविका प्रमाणपत्राची डीजीटल कॉपी, ई-सुविधा मोबाईल पमध्ये कायमस्वरूपी उपलब्ध राहणार असून, दीक्षान्त समारंभ संपल्यानंतर लगेचच विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राची डीजीटल कॉपी डीजीलॉकरवर उपलब्ध करण्यात आली.

या दीक्षांत समारंभानिमित्त सोहळा मंडपाबाहेर एक विशेष पुस्तक प्रदर्शन व विद्यापीठ नवोपक्रम माहिती प्रदर्शन मांडण्यात आले होते. त्यास विद्यार्थी, पालक, मित्रपरिवार व अभ्यागत यांनी मोठ्या संख्येने भेट देत त्याची पाहणी केली.

# प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

लातूर- माईर्स एमआयटी पुणेचे संस्थापक अध्यक्ष




विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचा ८६ वा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम घेवून साजरा करण्यात आला. डॉ. कराड यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या दंत आरोग्य शिबिरात ३८९ रुग्णांची व फिजीओथेरपी उपचार शिबिरात १६३ रुग्णांची तपासणी करुन उपचार करण्यात आले. तर रक्तदान शिबिरात ४८ जनांनी रक्तदान केले.

एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालय यांच्या वतीने डॉ. विश्वनाथ कराड यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी श्रीमती सरस्वती कराड रक्तपेढीच्या माध्यमातून रक्तदान शिबिर घेण्यात आले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन रुग्णालय अधिक्षक डॉ. सी. एस. पाटील व प्राचार्य डॉ. सुभाष खत्री यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ पावडशेट्टी, डॉ. विजयकुमार त्रिपाठी, प्रशासकीय अधिकारी सत्यवान झरे, डॉ. रिषा कांबळे, डॉ. पवन कुमार, डॉ. शितल घुले, डॉ. मोहम्मद झिशान, डॉ. सलीम शेख, डॉ. प्रमोद गायसमुद्रे, डॉ. अनिल साठे, डॉ. स्मिता मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या रक्तदान शिबिरात ४८ रक्तदात्यांनी रक्तदान करुन डॉ. कराड यांचा वाढदिवस साजरा केला.

एमआयडीएसआर दंत रुग्णालयाच्या वतीने लातूर शहरातील प्राथमीक नागरी आरोग्य केंद्र, काळे गल्ली येथे घेण्यात आलेल्या मोफत दंत आरोग्य तपासणी शिबिरात ७३ रुग्णांची दंत आरोग्य तपासणी करुन प्रथमोपचार करण्यात आले. या शिबिरात दंत रोग तज्ज्ञ डॉ. प्रकाश कसबे, डॉ. पुजा वाघमारे, डॉ. स्वाती हजारे, डॉ. प्रेरणा कायपलवाड यांनी सेवा बजावली. तसेच या सर्व रुग्णांना टूथब्रश व टूथपेस्टचे वाटप करण्यात आले.

लातूर शहरातील नेटिझन फाऊंडेशन स्कुल येथे मोफत दंत आरोग्य तपासणी शिबिर



घेण्यात आले. या शिबिरात दंत रोग तज्ज्ञ डॉ. सोमनाथ गित्ते, डॉ. अंकीता शिंत्रे, डॉ. रुचीता वलाकाटे, डॉ. अजित सोमवंशी, डॉ. गणगे श्रेया, डॉ. स्नेहा गायकवाड, डॉ. अर्जुन घोडके यांनी मुख - दंत रोग, हिरड्या व त्यासबंधी आजार, दातांना लागलेली किड, वेडेवाकडे दात अशा ३१७ रूग्णांची दंत रोग तपासणी करुन प्राथमिक उपचार करण्यात आले. तसेच दंत आरोग्य कसे राखावे, दंत रोग टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय, दुखापतीनंतर दातांची घ्यावयाची काळजी आदी विषयी डॉ. सोमनाथ गित्ते यांनी माहिती दिली.

एमआयडीएसआर दंत रुग्णालयाच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजना अर्थात ईसीएचएस रुग्णांसाठी स्वतंत्र दंत आरोग्य तपासणी व उपचार विभागाचा शुभारंभ व ओरल पॅथॉलॉजी विभागाचे उद्धाटन प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे व माजी सैनिक तथा प्रशासकीय अधिकारी शंकर ससाने यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उप प्राचार्य डॉ. यतिश कुमार जोशी, डॉ. अश्विनी बिरादार, डॉ. वर्षा सांगळे, डॉ. राघवेंद्र मेत्री, मुख्य प्रशासकीय अधिकारी सुनील कवटेकर, बाबासाहेब सुर्यवंशी, दक्षता अधिकारी सतिश बाबळसुरे, डॉ. सरस्वती बंदखडके, डॉ. अतुफा बक्श, तंत्रज्ञ नेताजी जाधव कार्यक्रम समन्वयक ज्ञानोबा केंद्रे आदी उपस्थित होते. त्याचबरोबर वाढदिवसानिमित्त ओरल पॅथॉलॉजी विभागाच्या वतीने रांगोळी स्पर्धा तर पेरिओडोंटोलॉजी



विभागाच्या वतीने रिल मेकिंग स्पर्धा घेण्यात आली.

डॉ. विश्वनाथ कराड यांच्या वाढदिवसानिमित्त एमआयपी फिजीओथेरपी महाविद्यालय येथे मोफत फिजिओथेरपी उपचार शिबिर घेण्यात आले. या शिबिरात मानदुखी, पाठदुखी, कंबरदुखी, खांदादुखी, मणक्याचे आजार, गुडघेदुखी, सांधेदुखी, संधीवात, हातापायांना मुंग्या येणे, मार लागलेले खेळाडू अशा विविध आजारांच्या १६३ रुग्णांवर फिजिओथेरपी तज्ज्ञांकडून विविध प्रकारचे फिजिओथेरपी उपचार करण्यात आले. त्याचबरोबर दैनंदिन जीवनातील कामाची, बसण्याची योग्य पद्धत, निरोगी जिवनशैली या विषयी उपस्थित रूग्णांना माहिती देण्यात आली. तसेच वाढदिवसानिमित्त एमआयपी फिजीओथेरपी महाविद्यालयाच्या वतीने वृक्षारोपन करण्यात आले.

या शिबिरास प्राचार्या डॉ. सुभाष खत्री, डॉ. विश्वनाथ पावडशेट्टी, डॉ. रिषा कांबळे, डॉ. पवन कुमार, डॉ. शितल घुले, डॉ. मोहम्मद झिशान, डॉ. सलीम शेख, डॉ. प्रमोद गायसमुद्रे, डॉ. अनिल साठे, डॉ. स्मिता मुंडे यांनी सेवा बजावली.

# लातूर ग्रामीण भाजपचे प्रमुख पदाधिकारी अनंत कणसे यांची भाजपला सोडचिठ्ठी,जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते काँग्रेस मध्ये केला जाहीर प्रवेश

मुरुड (ता. लातूर ग्रामीण) भारतीय जनता पार्टीचे लातूर ग्रामीणमधील महामंत्री तथा मुरूड ग्रामपंचायत सदस्य अनंत कणसे यांनी आपले सहकारी रामकृष्ण कर्ण पुदाले,विनोद पुदाले,सुभान सय्यद,रंजित धाकतोडे, इर्शाद तांबोळी,चंद्रकांत निचळे,अमोल पिंपरे,महाविर टिळक व शेकडो समर्थकांसह काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील काँग्रेस उमेदवारांच्या प्रचारार्थ मुरूड येथे आयोजित सभेत, लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला.

यावेळी बोलताना अनंत कणसे म्हणाले की, मागील बावीस वर्षांपासून मी भाजपमध्ये निष्ठेने काम करत आलो आहे मात्र पक्षात कार्यकर्त्यांना सन्मानाची वागणूक दिली जात नव्हती. मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्यांची कदर न करता, त्यांना डावलले जात होते. विकासाचे राजकारण करण्याऐवजी लातूर ग्रामीणचे आमदार केवळ देशमुख




कुटुंबाविरोधात द्वेषाचे राजकारण करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

काँग्रेसमध्ये प्रवेश करण्यामागे धिरज विलासराव देशमुख यांचे नेतृत्व, विकासाची दृष्टी आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांना दिले जाणारे प्रोत्साहन हे प्रमुख कारण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास, शेतकरी, युवक आणि महिलांसाठी ठोस काम करणारा पक्ष म्हणून काँग्रेसकडे पाहिले जाते, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी धिरज विलासराव देशमुख यांनी अनंत कणसे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे काँग्रेस पक्षात स्वागत केले. ते म्हणाले, काँग्रेस हा कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या प्रत्येकाला येथे सन्मान मिळतो. येणाऱ्या काळात लातूर ग्रामीणचा विकास अधिक गतीने करण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन काम केले जाईल.

या पक्षप्रवेशामुळे लातूर ग्रामीण तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाला याचा निश्चितच फायदा होईल, असा विश्वास स्थानिक नेत्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास काँग्रेसचे पदाधिकारी, स्थानिक नेते, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. सभेदरम्यान काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

# झेडपी निवडणुकांसाठी मतदार यादीतलं नाव शोधा, मोबाईलवरच सुविधा; निवडणूक आयोगाचं खास ॲप

मुंबई : राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समितीच्या निवडणुकांसाठी निवडणूक (एश्रशलींळेप) होत असून ७ फेब्रुवारी रोजी मतदान (तींळपस) आहे. तर, ९ फेब्रुवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाकडून मतदान प्रक्रियेसाठी सर्व तयारी पूर्णत्वास येत आहे. राज्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने शासकीय दु:खवटा पाळण्यात आल्याने निवडणुकांची तारीख दोन दिवस पुढे ढकलण्यात आली. तर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील आपल्या सर्वच सभा रद्द केल्या आहेत. तर, स्थानिक नेत्यांकडून जिल्हा पातळीवर प्रचारसभा होत आहेत. त्यातच, मतदानाच्या तयारीला लागलेल्या कार्यकर्ते आणि मतदारांसाठी प्रशासनाने गुडन्यूज दिली आहे.

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठीच्या मतदार यादीतील मतदाराचे नाव व मतदान केंद्र शोधण्यासाठी ‘मताधिकार’ मोबाईल प उपलब्ध करून देण्यात आले आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली आहे. या निवडणुकांसाठी ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार असून, त्यासाठी ‘मताधिकार’ मोबाईल प ‘गुगल प्ले स्टोअर’वरून डाऊनलोड करता येईल. या पमध्ये मतदाराचे नाव शोधण्यासाठी दोन पर्याय उपलब्ध आहेत. त्यानुसार मतदाराचे संपूर्ण नाव किंवा मतदार ओळखपत्राचा (एझखउ) क्रमांक नमूद करून मतदार यादीतील नाव शोधता येते. पच्या माध्यमातून आपले मतदान केंद्रही कळू शकेल, असेही आयोगाने सांगितले.

दरम्यान, याशिवाय मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी https://mahasecvoterlist.in/ हे संकेतस्थळदेखील उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यातील डशरीलह छराश ळप तींशी डळीीं वर क्लिक करून मोबाईल पप्रमाणेच ‘नाव’ किंवा ‘मतदार ओळखपत्रा’चा (एझखउ) क्रमांक नमूद करुन नाव शोधता येईल, असे राज्य निवडणूक आयोगाच्या प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे.

लातूरमधील गावात २७८९ मतदारांची नावे वगळली-लातूर जिल्ह्यातील हरंगुळ पंचायत समिती गणातील खाडगाव गावात जिल्हा परिषद निवडणुकीपूर्वी गंभीर प्रकार समोर आला आहे. या गावातील तब्बल २७८९ मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आल्याचे उघड झाले आहे. अनेक नागरिकांनी याआधी नियमित मतदान केले असतानाही यावेळी त्यांची नावे यादीत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात उमेदवारांच्या कुटुंबीयांसह सरपंच यांच्या पत्नीचे आणि विद्यमान ग्रामपंचायत सदस्यांची नावेही मतदार यादीत नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे हा प्रशासकीय गोंधळ की हेतुपुरस्सर केलेली चूक, असा सवाल उपस्थित झाला आहे.

# संभाजी महाविद्यालयात विद्यार्थी संसदेचे उद्घाटन

मुरुड/ महेंद्र आल्टे: येथील संभाजी कॉलेज येथे आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी विद्यार्थी संसद उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संभाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. अशोक काळम हे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. डॉ. पांडुरंग



शितोळे हे उपस्थित राहिले. पाहुण्यांचा परिचय प्रा. क्षीरसागर मधुकर यांनी करून दिला त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. चव्हाण डी. आर. यांनी केले. यावेळी ते म्हणाले की, सर्व वर्गातून गुणानुक्रमे पहिले आलेले विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून घेतले परंतु या व्यतिरिक्त विविध क्षेत्रात कला गुणसंपन्न विद्यार्थ्यांनाही या विद्यार्थी संसदेत प्रतिनिधित्व मिळत असते जसे क्रीडा सांस्कृतिक एनएसएस अशा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही विद्यार्थी संसदेत समावेश होत असतो अशा सर्वांचे मिळून विद्यार्थी संसद गठीत करण्यात आली. प्रमुख पाहुणे प्रा डॉ पांडुरंग शितोळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण विकसीत व्हावेत विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला पाहिजे.महाविद्यालयाचे वातावरण हे गुण विकसीत करते व विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास महाविद्यालयीन जीवनातच वाढतो. विद्यार्थ्यांनी तडजोड करू नये. शिस्त,नैतिकता ही मूल्ये विद्यार्थी जीवनात महत्वाची आहेत. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्व गुण विकसीत करण्यासाठी प्रथम विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या प्रत्येक ॲक्टिव्हिटी कार्यक्रमांमध्य सहभाग घेण्याचे आवाहन केले. विद्यार्थी संसद सचिव कु.पठाण तब्बू हीने याप्रसंगी मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मधुकर क्षीरसागर यांनी केले. तसेच या कार्यक्रमाचे आभार प्रा.पाटोळे ए.आर. यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्रा. गायकवाड एम. बी. , प्रो. डॉ. वाघमारे एच.एस., आयक्युएसी समन्वयक प्रो. डॉ. जाधव जी. एल., प्रा डॉ. रणदिवे डी.एम. ,प्रो. डॉ.चावरे एम.व्ही. प्रा. बालणे, प्रा.नायने यांचीही यावेळी उपस्थिती होती तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनीही या कार्यक्रमासाठी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# आवादा कंपनीच्या विरोधात आत्मदहन करण्याचा शेतकऱ्यांनी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे दिला इशारा

केज/प्रतिनिधी-शेतकऱ्याची झालेली नुकसान ही भरून न दिल्यास आवादा कंपनीच्या विरोधात आत्मदहन करणार असल्याचा इशारा केज तहसीलदार यांना लेखी निवेदनाद्वारे शेतकरी अशोक उत्तम गायकवाड यांनी दिला आहे.



याबाबतची सविस्तर माहिती अशी की,केज तालुक्यातील शिरुरघाट येथील शेतकरी अशोक उत्तम गायकवाड यांची नांदुरघाट शिवरात स.नं.१२६/२ मध्ये जमीन असून सदर जमिनीत त्यांचा एक बोरवेल आहे. अशोक गायकवाड यांच्या बोरवेल चे आवादा कंपनीकडून नुकसान झालेले आहे.

अशोक गायकवाड यांच्या बोरवेलचे झालेले नुकसानीचे काम त्यांना करून घेण्यासाठी सांगितले. त्यावरून गायकवाड यांनी त्यांच्या बोरवेलचे दुरुस्तीचे काम केले आहे.

गायकवाड यांच्या बोरवेलचे दुरुस्तीचे काम हे गायकवाड यांनी केले असता त्यांना दुरुस्तीसाठी लागलेल्या खर्चा पोटीचे पैसे सदरील कंपनीने अद्यापही दिलेले नाहीत. तर आता ही कंपनी पळून गेली आहे. संबंधित महसूल विभागाचे मंडळ अधिकारी व तलाठी यांनी पंचनामा केला आहे. गायकवाड यांचे आर्थिक नुकसान झालेले असुन या नुकसान झालेल्या घटनेला अनेक दिवसाचा कालावधी झालेला आहे. तरी त्यांना सदरील आवादा कंपनीने अद्यापही नुकसान भरपाई दिलेली नाही.त्यामुळे अशोक गायकवाड यांना त्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई कंपनीने तात्काळ न दिल्यास शिरूर घाट येथील शेतकरी अशोक उत्तम गायकवाड हे दिनांक ११ फेब्रुवारी २०२६ रोजी मस्साजोग येथील आवादा कंपनीच्या (झिरो पॉईंट) या ठिकाणी आत्मदहन करणार आहेत. असे लेखी निवेदनाद्वारे प्रशासनाला अशोक उत्तम गायकवाड यांनी इशारा दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती तहसीलदार केज, मुख्यमंत्री कार्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई, उपमुख्यमंत्री कार्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई, पोलीस ठाणे केज, आवादा कंपनी मस्साजोग यांना दिल्या आहेत.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.